महाराष्ट्र शासन

**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**

**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र. पोमसं/९(NGO)/जीवन रक्षा पदक-२०२४/१५/२०२४ - 204 दि. 21 /५/२०२४

**विषय : जीवन रक्षा पदक-२०२४ करिता शिफारस सादर करण्याबाबत.**

**परिपत्रक**

ooo

केंद्र शासनाकडून स्वत:च्या जीवाची पर्वा न करता मानवतेच्या दृष्टीकोनातून केलेल्या कामाबद्दल जीवन रक्षा पदक प्रदान करण्यात येते. यामध्ये पाण्यात बुडण्याच्या घटना, अपघात, आगीच्या घटना, विद्युत शॉर्ट सर्किटने घडणाऱ्या घटना, भुकंप, दरड कोसळणे, रानटी जनावराने केलेला हल्ला व खाणीमध्ये केलेले बचावकार्य इत्यादीमध्ये स्वत:च्या जीवाची पर्वा न करता जीव वाचवतांना दाखविलेल्या शौर्यपुर्ण कामगिरी करणाऱ्या व्यक्तिस सदर पदक दिले जाते.

केंद्र शासनाने त्यांचे पत्र क्र. १७/०२/२०२४-Public, दिनांक ०१/०४/२०२४ अन्वये १ ऑक्टोबर, २०२२ नंतर घडलेल्या घटनांसाठी जीवन रक्षा पदक-२०२४ प्रदान करण्यात येणार आहे. त्याकरीता महाराष्ट्र पोलीस दलातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांच्या शिफारशी मागविल्या आहेत. सोबत केंद्र शासनाचे पत्र सहपत्रासह संलग्न केले आहे.

जीवनरक्षा पदक हे खालील ३ प्रवर्गासाठी दिले जातात.

१) **सर्वोत्तम जीवन रक्षा पदक** - अत्यंत धोकादायक परिस्थितीमध्ये एखादया व्यक्तीचा जीव वाचवितांना बचावकार्य करणाऱ्या व्यक्तिच्या जीवाला आत्यंतिक धोका पोहोचला असेल, अशावेळी अतुलनीय शौर्याचे प्रदर्शन करणाऱ्या व्यक्तींना पदक प्रदान करण्यात येते.

२) **उत्तम जीवन रक्षा पदक** - अत्यंत धोकादायक परिस्थितीमध्ये स्वत:चा जीव धोक्यात टाकून एखादया व्यक्तिचा जीव वाचवितांना दाखविलेले धैर्य व तत्परता दाखवून जीव वाचवणाऱ्या व्यक्तीला सदरचे पदक प्रदान करण्यात येते.

३) **जीवन रक्षा पदक** - एखादया व्यक्तीचा जीव वाचवितांना बचाव कार्य करणाऱ्या व्यक्तिला गंभीर दुखापत होण्याच्या परिस्थितीत धैर्य व तत्परता दाखवून जीव वाचवणाऱ्या व्यक्तीला सदरचे पदक प्रदान करण्यात येते.

तरी, खालील सर्व पोलीस घटक प्रमुख यांनी जीवन रक्षा पदकासाठी आवश्यक अटी व शर्ती पूर्ण करणाऱ्या पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे विहीत नमुन्यातील प्रस्ताव व प्रमाणपत्र दि. ३०/६/२०२४ पर्यंत कृपया या कार्यालयास सादर करावे.

(के. एम. मल्लिकार्जुन प्रसन्ना)
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना),
पोलीस महासंचालक, म.रा., मुंबई यांचेकरीता

प्रति,

पोलीस महासंचालक, लोहमार्ग, म.राज्य, मुंबई (सविनय सादर)
महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म. राज्य, मुंबई

सर्व पोलीस आयुक्त (बृहन्मुंबई सविनय सादर)
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, म.राज्य, मुंबई
संचालक, पोलीस बिनतारी संदेश विभाग व मोटार परिवहन, म.राज्य, पुणे
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, म.राज्य, पुणे
अपर पोलीस महासंचालक, फोर्स वन, मुंबई / नागरी हक्क संरक्षण, मुंबई / प्रशिक्षण व
खास पथके, म.राज्य, मुंबई / वाहतूक, म.राज्य, मुंबई /
रा.रा.पो.बल, मुंबई / दहशतवाद विरोधी पथक, म.राज्य, मुंबई
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक
संचालक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे
सर्व विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक परिक्षेत्रीय / महिला अत्याचार
प्रतिबंधक विभाग, म.राज्य, मुंबई / मोटार परिवहन पुणे /
रा.रा.पो.बल, पुणे / नागपूर / नक्षल विरोधी अभियान, नागपूर /
सायबर सेल, मुंबई
सर्व पोलीस अधीक्षक (जिल्हा / रेल्वे / बिनतारी संदेश)
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्रमांक १ ते १६
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र / प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक
प्राचार्य, अपारंपरिक अभियान प्रशिक्षण केंद्र, नागपूर

पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, म.राज्य, मुंबई

२. सदरचे परिपत्रक दि. ३०/६/२०२४ पर्यंत पोलीस महासंचालक कार्यालयाच्या संकेतस्थळावर "Jeevan Raksha Padak२०२४" "जीवन रक्षा पदक-२०२४" या नावाने प्रसिध्द करावे.